जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 FEB 2019
महाराष्ट्र टाईम्स

# राष्ट्रवादीतर्फे कुलगुरूंचा सत्कार

**कोल्हापूर टाइम्स टीम**

शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना यापूर्वी देण्यात येणाऱ्या १६० रुपये भत्त्यात वाढ करून तो ३५० रुपये करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा राष्ट्रवारी काँग्रेसवतीने शहराध्यक्ष आर. के. पोवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अधिसभा सदस्य प्रताप माने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माने म्हणाले, 'खेळाडूंच्या भत्त्यात वाढ करण्याची मागणी सातत्याने केली जात होती. या मागणीची दखल घेतल्याने खेळाडूंना आर्थिक लाभ होणार आहे. तसेच खेळताना दुखापत झाल्यास खेळाडूंवर उपचारासाठी आर्थिक ताण येतो. यासाठी खेळाडूंना विमा योजना लागू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. झोनल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण मिळण्याची गरज आहे.'

अधिकार मंडळाच्या संमतीने विद्यापीठातील खेळाडू विद्यार्थ्यांसाठी विमा योजना लागू करण्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच अतिरिक्त गुण व विमा योजनेमुळे खेळाडू विद्यार्थी सुरक्षित होतील यासाठी प्रयत्न केले जातील असे यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# विद्यापीठ मानसशास्त्र परिषद संशोधन स्पर्धेत 'महावीर'चे यश

**कोल्हापूर :** महावीर महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातील पदवी विभागातील यशोदा नागर व वृंदा पोतनीस यांना संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांक व अश्विनी पाटील यांनी तृतीय क्रमांक मिळविला. प्राध्यापक गटात प्रा. सुरेश संकपाळ यांना प्रथम क्रमांक मिळाला. शिवाजी विद्यापीठ मानसशास्त्र परिषदेचे पाचवे राज्यस्तरीय अधिवेशन इस्लामपूर येथे झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. भरत नाईक व प्रा. शिरीष शितोळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे व संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे यांनी अभिनंदन केले.